

कॉलेज कट्टा

# श्री जैन विद्याप्रसारक मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

■ श्रुती गांधी (रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी चिंचवड)

श्री जैन विद्याप्रसारक मंडळाचा ९७ वा वर्धापनदिन रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. सचिन फेगडे यांनी श्री गणेशलालजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले. प्राचार्य डॉ. फेगडे यांनी सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांना श्री जैन विद्या प्रसारक मंडळाच्या आतापर्यंतच्या प्रगतीविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. मंजुश्री गुंजेगावकर यांनी केले. रोहन देसाई (आयबीएम पार्टनरशिप असोसिएट, प्रथम इन्फोटेक फाउंडेशन) यांचे पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट विषयावर व्याख्यान झाले. सूत्रसंचालन प्रा. सुचिता खोत यांनी केले. प्रा. कल्याणी भालेकर यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांसाठी 'हार्मफुल ड्रग ॲडिक्शन', 'व्हिडिओ मेकिंग', 'फूड सेफ्टी ॲंड अवेअरनेस, 'पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा झाली. मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलला भेट देऊन विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. प्रा. स्वाती डने आणि प्रा. सविता पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.





र्थीच्या
ा करण्यासाठी
ली होती. श्री
निनाद केला.
विभागणी
ले. कॉलेज
साठी आवश्यक
र्थ्यांनी उत्साहाने